# प्रवेश पात्रता व पूर्तता नियम

**मुंबई विद्यापीठ परिपत्रक Aff/Recog.I/ICC/Admission (२०१३-१४ ) of २०१३ नुसार प्रथम वर्ष कला, वाणिज्य, आणि विज्ञान तसेच पदव्युत्तर प्रथम वर्ष कला - भूगोल व विज्ञान - ऑरगॅनिक केमिस्ट्री, ॲनालेटीकल केमिस्ट्री व फिजिक्स या वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रवेशपूर्व Online नोंदणी करावी लागेल. त्यानंतरच महाविद्यालयामध्ये प्रवेश घेता येईल. संबंधित कार्यक्रम विद्यापीठाकडून उपलब्ध झाल्यानंतर जाहीर करण्यात येईल.**

- **प्रथम वर्ष कला :**

  या वर्गात प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पुढील पैकी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

  १) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही उच्च माध्यमिक मंडळाची इ. १२ वी कला/वाणिज्य/विज्ञान शाखेची परीक्षा अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

  २) महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची /मंडळाची प्री - डिग्री किंवा समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक.

- **प्रथम वर्ष बी. कॉम. :**

  या वर्गात प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पुढील पैकी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

  १) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही उच्च माध्यमिक मंडळाची इ. १२ वी वाणिज्य शाखेची परीक्षा अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

  २) महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची /मंडळाची प्री -डिग्री किंवा समकक्ष परीक्षा इंगजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक.

- **प्रथम वर्ष विज्ञान :**

  या वर्गात प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पुढील पैकी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

  १) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही उच्च माध्यमिक मंडळाची इ. १२ वी विज्ञान शाखेची परीक्षा किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

- **प्रथम वर्ष संगणक विज्ञान:**

  या वर्गात प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पुढील पैकी परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

  १) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही उच्च माध्यमिक मंडळाची किंवा समकक्ष मंडळाची इ. १२ वी विज्ञान शाखेची परीक्षा किमान ४५ टक्के गुणांनी उत्तीर्ण किंवा इ.१२ वी कला/वाणिज्य शाखेची परीक्षा किमान ६० टक्के गुणांनी उत्तिर्ण असणे आवश्यक.

  २) ज्या विद्यार्थ्यांचा इ. ११ वी व १२ वी मध्ये गणित विषय नाही, अशा विद्यार्थ्यांना ४५ तासांचा गणित प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Basics of Mathematics) प्रथम वर्षात पूर्ण करणे अनिवार्य आहे.

- **पदव्युत्तर प्रथम वर्ष कला (एम.ए. भूगोल) :**

  या वर्गात प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पुढील परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

  १) कोणत्याही विद्यापीठाची बी.ए./बी.एस्सी. पदवी परीक्षा भूगोल विषयातून उत्तिर्ण असणे आवश्यक आहे.

- **पदव्युत्तर प्रथम वर्ष विज्ञान (एम.एस्सी. :रसायनशास्त्र - Organic, Analytical)**

  या वर्गात प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पुढील परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

  १) कोणत्याही विद्यापीठाची बी.एस्सी. पदवी परीक्षा रसायनशास्त्र विषयातून उत्तिर्ण असणे आवश्यक आहे.

- **पदव्युत्तर प्रथम वर्ष विज्ञान (एम.एस्सी. :भौतिकशास्त्र)**

  या वर्गात प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पुढील परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

  १) कोणत्याही विद्यापीठाची बी.एस्सी. पदवी परीक्षा भौतिकशास्त्र विषयातून उत्तिर्ण असणे आवश्यक आहे.

**प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदप्रत्रे -**

प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान या वर्गामध्ये प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

१) इ. १२ वी चे मूळ गुणपत्रक (डुप्लीकेट गुणपत्रकावर प्रवेश दिला जाणार नाही) व त्याच्या दोन सत्यप्रती, इ. १० वी चे गुणपत्रक व प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत आर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
२) इ. १२ वी ची शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला - मूळ प्रत आणि एक सत्यप्रत.
३) राखीव जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य त्या अधिकाऱ्याचा जातीचा दाखला जोडणेआवश्यक
४) मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नावनोंदणी केलेल्या अर्जाची प्रत.
५) आधार कार्डच्या, रेशन कार्डच्या आणि असल्यास मतदान ओळखपत्राच्या दोन स्वयंसाक्षांकित सत्यप्रती
६) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची एक स्वयंसाक्षांकित सत्यप्रत.
७) दारिद्रयरेषेखालील दाखल्याची एक स्वयंसाक्षांकित सत्यप्रत.

**महत्वाचे**

**इ. १२ वी परिक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र प्रथम वर्ष वर्गाच्या प्रवेशासाठी विद्यापीठाकडून मिळणाऱ्या पात्रता दाखल्यासाठी विद्यापीठाकडे पाठवणे आवश्यक असल्यामुळे ते ताबडतोब परत मिळणार नाही. विद्यापीठाकडून परत आल्यानंतर ते विद्यार्थ्याला परत देण्यात येईल विद्यार्थ्यांनी त्याच्या किमान पाच सत्यप्रती काढून स्वत:जवळ ठेवाव्यात.**

पदव्युत्तर एम.ए. भूगोल व एम.एस्सी. ऑरगॅनिक, ॲनालेटीकल व फिजिक्स भाग १ या वर्गामध्ये प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

१) इ. १० वी, १२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
२) इ. १२ वी ची शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला - एक सत्यप्रत.
३) ट्रान्सफर सर्टीफिकीट मुळ प्रत, मायग्रेशन सर्टीफिकीट मुळ प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
४) राखीव जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला जोडणेआवश्यक आहे.
५) मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नावनोंदणी केलेल्या अर्जाची प्रत.
६) आधार कार्डच्या, रेशन कार्डच्या आणि असल्यास मतदान ओळखपत्राच्या दोन स्वयंसाक्षांकित सत्यप्रती
७) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची एक स्वयंसाक्षांकित सत्यप्रत.
८) दारिद्रयरेषेखालील दाखल्याची एक स्वयंसाक्षांकित सत्यप्रत.

Activate
to Settir

**महत्वाचे**

**मुंबई विद्यापीठ व्यतिरिक्त अन्य विद्यापीठातून येणा-या विद्यार्थ्यांनी त्यांची पात्रता निश्चिती करण्याकरीता आपल्या पदवी प्राप्त विद्यापीठातून शैक्षणिक कागपत्रांची पडताळणी अहवाल (Education Verification Report) मुदतीत प्राप्त करुन तो महाविद्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.**